१२८

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::

" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,

फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९

शेती पुरक व्यवसाय मध्यम मुदत कर्ज धोरण

Z:\Vaishu\Karj Dhoran 2026\Date 01.01.2026\Individual\Covering.Doc

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

दिनांक ०१/०१/२०२६ पर्यंत अद्यावत बदलासह कर्ज धोरण

``शेतीपुरक व्यवसाय मध्यम मुदत कर्ज धोरण``

या बँकेचे कार्यक्षेत्र मुंबई जिल्ह्यापुरते मर्यादित असुन या कार्यक्षेत्रात शेती व्यवसाय होत नसल्याने, शेती व शेतीपुरक कारणासाठीचा कर्ज पुरवठा करणे शक्य होत नाही. तथापी निधी उपलब्ध असुनही, बँकेच्या कर्ज व्यवहारात आवश्यक वाढ होत नसुन बँकेच्या C.D. Ratio वर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मुंबई व्यतिरिक्तच्या इतर जिल्ह्यातुन, शेतीपुरक कारणासाठीचे कर्ज प्रस्ताव (उदा. शेळी मेंढी पालन, दुग्धव्यवसाय, व हरित गृह (पॉलीहॉऊस) बँकेस प्राप्त होत असल्याने, अशा कारणासाठी बँकेचे कॉर्पोरेट कर्ज धोरणा अंतर्गत स्वतंत्र कर्ज धोरण तयार केल्यास, बँकेच्या अतिरिक्त निधीचा विनीयोग शेतीपुरक व्यवसाय वृध्दीसाठी होऊन सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्नही यातुन साध्य होवू शकेल. या सर्व बाबी विचारात घेऊन बँकेने "शेतीपुरक व्यवसाय मुदत कर्ज धोरण" तयार केले असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

अ] शेळी / मेंढी प्रजोत्पादन योजनेअंतर्गत बंदिस्त शेळी / मेंढी पालन मुदत कर्ज

कर्ज मर्यादा : प्रकल्प अहवालाचे ७५% कमाल रु.५.०० कोटी इतकी राहील. (नाबार्डचे सी.एम.अे.नॉर्म्सनुसार कर्जाची एक्सपोजर मर्यादा विचारात घेतली जाईल.) (कर्जदाराची प्रकल्पातील गुंतवणूक २५% इतकी राहील.)

कर्ज कालावधी : ६ वर्षे (१ वर्ष सवलतीच्या (मोरोटोरियअम) कालावधीसह)

व्याजदर : कॉर्पोरेट कर्ज धोरणानुसार राहील.

कार्यक्षेत्र : बँकेच्या कॉर्पोरेट कर्ज धोरणानुसार राहील.
(अर्जदाराने प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करणे आवश्यक राहील तसेच सदर प्रकल्प अहवालाची, सदर क्षेत्रातील तज्ञांकडून, प्रकल्पाची, तांत्रिक व आर्थिक व्हायबेलिटी विचारात घेऊन कर्ज मर्यादा मंजूर केली जाईल.)

जमिनदार : दोन जमिनदार आवश्यक

मुख्यतारण : प्रकल्पाची जमिन

कर्जापोटी घ्यावयाचे : कर्ज रकमेइतकी स्थावर मालमत्ता (मुंबई अथवा मुंबई बाहेरील) जोडतारण म्हणून घेण्यात येईल.

अतिरिक्त तारण

पात्र लाभधारक : बँकेच्या कॉर्पोरेट कर्ज धोरणानुसार राहील.

प्रोसेसिंग फी : कॉर्पोरेट कर्ज धोरणानुसार राहील.

सर्वसाधारण पात्रता व निकष :

१) या योजनेअंतर्गत (शेळया/मेंढया खरेदीसाठी व शेड बांधण्यासाठी कर्ज पुरवठा करण्यात येईल.

२) कंपनीचे मालकीची कर्ज रक्कमे इतकी जमिन पैकी किमान २ एकर क्षेत्र हिरव्या चाराकरीता ओलीताखाली असावी.

३) कंपनीकडे संबंधित व्यवसायातील अनुभवी व प्रशिक्षित कर्मचारी असणे आवश्यक राहील. (प्रशिक्षणाचा दाखला सोबत जोडावा.)

४) बंदिस्त शेळी / मेंढी पालनासाठी प्रकल्प अहवाल, आराखडा, अंदाजपत्रक आवश्यक असुन त्यानुसार तांत्रिक अधिकाऱ्याचे मार्गदर्शन व सुचनांनुसार शेड बांधून घेणे आवश्यक राहील. शेड बांधणीसाठी पुरेशी जमिन उपलब्ध असावी. सदर प्रकल्पासाठी एका बिडसाठी (५०+२) किमान १००० स्क्वे.फूटाचे शेड बांधकाम बँकेने संमत केलेल्या आराखडयानुसार असावे.

५) शेड बांधकामासाठी कर्जाची उचल प्रथम ५०% व नंतर ५०% अशा दोन हप्त्यात दिली जाईल. प्रत्येक हप्त्याची उचल करताना अगोदर उचल केलेल्या रक्कमेचा पुर्ण विनियोग केल्याबाबत कर्जदार व बँक तपासणीस यांचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच पुढील उचल दिली जाईल.

६) शेड बांधकाम पूर्ण होऊन त्यामध्ये विद्युत पुरवठ्याची सिध्दता असल्याची तपासणीस यांनी खात्री करून तसा दाखला दिल्यानंतर, शेळयांसाठी मंजुर युनिटपैकी ५०% शेळया / मेंढया व बोकड / मेंढे खरेदी करून देऊन त्याचा योग्य विनियोग झाल्याची शाखा व्यवस्थापक / तपासणीस यांनी प्रत्यक्ष खात्री करून एक महिन्यांनी उर्वरीत शेळया / मेंढया खरेदी करण्यात येतील.

७) शेळया / मेंढयांची खरेदी, स्थानिक बाजार अन्य राज्यातील बाजारातून किंवा महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ मेंढी फार्म, गोखले नगर, पुणे यांचेकडून केली पाहिजे. पशु वैद्यकिय अधिका–यांकडून शेळया / मेंढयांना वेळच्या वेळी टॅगींग करून घेण्यात यावे.

८) अर्जदार कंपनीने स्वत:च्या निधीतून तसेच कर्जातुन खरेदी केलेल्या शेळया / मेंढया व शेड कर्जास तारण रहातील. बँकेच्या पुर्व परवानगी शिवाय सदरील शेळया / मेंढया व त्याची कोकरे विकता येणार नाहीत. विक्री केल्यास संपूर्ण कर्जफेड करावी लागेल. कर्जाचा गैरवापर झाल्यास कर्जदार कायदेशीर कारवाईस पात्र राहील तसे प्रतिज्ञापत्र कर्जदाराकडून घेण्यात येईल. शेळया/ मेंढयासाठी ओल्या व सुक्या चा–याची व्यवस्था शेडमध्ये करण्यात यावी.

९) शेडमध्ये शेळया / मेंढयांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व वीज पुरवठ्याची व्यवस्था असावी. तसेच कर्जदार ज्या ठिकाणी शेळी पालन करणार आहे, त्या गावापासून १० किमी चे आत पशुवैद्यकिय सेवा उपलब्ध असावी. या व्यवसायात पशुवैद्यकाशी सेवेबाबत करार केलेला असावा. त्याची प्रत सोबत जोडावी.

१०) सदर योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या शेळया / मेंढया व उत्पादित होणारी कोकरे ही बंदिस्त पध्दतीने संगोपन करण्याची हमी कर्जदाराने घ्यावयाची आहे. शेळयांची खरेदी, पैदास, विक्री मेंढ्याच्या लोकर विक्रींचे रजिस्टर इत्यादी तपशीलाची नोंदी रेकॉर्डला अद्यावत ठेवणे आवश्यक राहील.

११) शेळया / मेंढयांची खरेदी, पशुवैद्यकीय अधिकारी, बँक प्रतिनिधी, व कंपनीचे प्रतिनिधी यांचेमार्फत केली जाईल.

१२) सदर योजनेसाठी शिखर बँक / नाबार्ड यांच्या धोरणानुसार कर्ज पुरवठा करणेत येईल

१३) शेळया / मेंढया व शेडसाठीच्या कर्जाची पुर्ण परतफेड होईपर्यंत शेड व शेळयांचा विमा उतरविणे आवश्यक राहील. पहिल्या वर्षाच्या विमा हप्त्याची रक्कम कर्ज खाती नांवे टाकून परस्पर विमा कंपनीस भरणा केला जाईल व त्यापुढे दरवर्षी विमा हप्त्याएवढी रक्कम संस्थेच्या कर्ज खात्यात नांवे टाकून नियमीत विमा उतरविणेत येईल.

१४) कर्जाची मुदत ६ वर्षे राहील तसेच कर्जफेड सहामाही / वार्षिक हप्त्यांनी केली जाईल. सवलतीच्या कालावधीत व्याजाचा भरणा करावा लागेल.

१५) बंदिस्त शेळी / मेंढी पालन प्रकल्पास शाखाव्यवस्थापक / तपासणीस यांनी दर तिमाही भेट देऊन, प्रकल्प व्यवस्थित कार्यान्वित असल्याचा व कर्ज वसुली नियमित असल्याची खात्री करून तसा अहवाल केंद्र कार्यालयास नियमीत सादर करावा.

१६) संबंधित अर्जदार कंपनी राष्ट्रीयकृत किंवा स्थानिक ठिकाणच्या कोणत्याही बँकेचा / वित्तीय संस्थेचा कर्जदार / थकबाकीदार नसावी, तसे नो डयुज सर्टिफिकेट सादर करावे लागेल.

कर्जाची मर्यादा खालीलप्रमाणे राहील. (एका बीड करीता)	**कालावधी**	**परतफेड हप्ते**	**मोरॅटीयम कालावधी**
अ] शेळी संगोपन (५०+२ खरेदीसाठी)	५ ते ६ वर्षे		१२ महिने
१) शेळी (उस्मानाबादी संगमनेरी) प्रती रू.८०००/-	---,,--- ---"---	तिमाही/सहामाही/वार्षिक ---,,--- ---"-	--,,-- --"--
२) बोकड (उस्मानाबादी संगमनेरी) प्रती रू.१००००/-		-- सहामाही/वार्षिक ---,,---	१२ महिने
३) मेंढा / मेंढी प्रति रु.---------	६ वर्षे ६ वषे		
ब] बंदिस्त शेळी पालन युनिट (५० शेळी +२ व शेडसाठी)			
१) गवती छप्पर - रू.१,६४,६५०/-			
२) ए.सी./जी.आय- रू.२,०२,६५०/-			

तसेच अंतिम कर्ज मर्यादा, बीडचे पटीत, प्रकल्प अहवालाचे ७५% व कमाल रु.५.०० कोटी इतकी राहील.

कर्ज प्रकार :- सर्वसाधारण मध्यम मुदत शेळीपालनासाठी कर्ज.

अटी :-

१) कर्जदारा कंपनीच्या संचालकांना प्रचलित धोरणातील तरतुदी प्रमाणे नाममात्र सभासद असले पाहिजेत.

२) कर्जदार कंपनीकडून कर्ज रक्कमेइतकी विक्रीयोग्य स्थावरमालमत्ता तारण घेणेत यावे.

३) कंपनीने खरेदी केलेल्या जनावरांच्या किंमती इतका विमा धोरणांतील तरतुदीनुसार उतरविला पाहिजे व जनावरांना त्वरीत टॅगींग करून घेतले पाहिजे. सदर जबाबदारी अर्जदार कंपनीची राहील.

४) जनावरे खरेदी केल्यानंतर खरेदीच्या पावत्या कर्जदार कंपनीने बँकेकडे दिल्या पाहिजेत त्यावरून जनावरांचे रजिस्टर ठेवले पाहिजेत. सदर योजनेतंर्गत शक्यतो संगमनेरी, उस्मानाबादी व इतर जातीचेच शेळी / बोकड खरेदीसाठी कर्ज पुरवठा करणेत येईल.

५) उचल केलेल्या कर्जाचे रक्कमेपेक्षा कमी किंमतीची जनावरे खरेदी केल्यास शिल्लक राहिलेली रक्कम बँकेत कर्ज खाती भरणा केली पाहीजे व ही जाबाबदारी कंपनीची राहील.

६) संपूर्ण कर्ज फेड होणेपूर्वी जनावरांची विक्री केल्यास कर्जाची रक्कम व्याजासह संपूर्ण त्वरीत भरणा करावी लागेल. कर्जाची रक्कम न भरल्यास कर्जदार कायदेशीर कारवाईस पात्र राहिल.

(१२0)

७) कर्ज प्रकरणातील जमिनीवर कर्जाचा बोजा चढविणे आवश्यक आहे. तसेच सदर तारण मालमत्तेचे जमिनीचे मुल्यांकन व सर्च रिपोट सादर करावे लागेल.

८) मंजूर कर्जाची उचल मंजूरीचे तारखेपासून सहा महिन्याचे आत केली नाही. तर अशी मंजूर कर्ज मर्यादा रद्द समजण्यात येईल.

९) संस्थेचे कागदपत्र बँकेच्या अधिका–यास केव्हाही तपासण्याची मुभा राहील.

१०) जनावरे व साधनांवर कर्जाचा बोजा राहील व त्यांची विक्री बँकेच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

११) कर्ज मंजूरी पत्रात दर्शविल्याप्रमाणे कर्जाची मुदत व कर्ज हप्त्याचा कालावधी ठेवून धोरणातील तरतुदीनुसार (वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे) सवलतीचा १२ महिन्याचा कालावधी गृहीत धरून त्यानंतर हप्ते वसुलीस पात्र होतील.

१२) कर्जदार कंपनीकडून सह्या केलेले एक चेकबुक कर्ज हप्त्यापोटी कर्जवाटपापूर्वी घेण्यांत यावे व ते सेफ कस्टडीत सुरक्षित ठेवावे.

१३) कर्जाचा गैरवापर झाल्यास कर्जदार कायदेशीर कारवाईस पात्र राहतील व त्यासाठी होणारा संपूर्ण खर्च कर्जदाराकडून वसुल करण्यात यईल.

१४) शेड बांधकामासाठी ग्रामपंचायत/नगर पंचायत/महानगरपालिका यांची रितसर परवानगी सादर केली पाहीजे. सदर परवानगीवर बांधकाम करावयाचे जागेचे सर्व्हे नंबर व बांधकाम क्षेत्रांचा उल्लेख करावा लागेल. शेळयांसाठी शेड, विद्युत पुरवठयाची व पाण्याची सिध्दता असल्याची तपासणी अधिकारी यांनी खात्री करून तसा दाखला दिल्यानंतरच कर्जाची उचल दिली जाईल.

१५) तारण देवू केलेल्या क्षेत्रधारकाचे क्षेत्र कर्जास तारण देणेबाबत आवश्यक त्या स्टॅम्प पेपरवर संमतीपत्रक घेवून गहाणखतावर कंपनीच्या संचालक मंडळ सदस्यांच्या संमती दर्शक सह्या घेवून सर्व क्षेत्राचे रजिस्टर गहाणखत करून, त्यावर कर्जाचा रितसर बोजा निर्माण करून व ७/१२ वर बँकेच्या नावाचा बोजा चढवून तसे ७/१२ ८(अ) दप्तरी घेण्यात यावेत.

१६) प्रकरणासोबत सादर केलेली झेरॉक्स प्रती मुळ प्रतिवरून प्रमाणीत करून घेणेत यावी.

१७) ७/१२ उताऱ्यावर इतर अधिकारामध्ये असलेल्या नोंदीबाबत भविष्यात काही कायदेशिर बाबी उद्भवल्यास त्याचे निवारण करण्याची सर्वस्वी जबाबदारी कर्जदार कंपनीची राहील असे लेखी हमीपत्र कंपनीकडून कर्ज वाटपापूर्वी घेणेत यावे.

१८) संबंधित कर्जाबाबतच्या धोरणात्मक अटीं कर्जदारास बंधनकारक राहतील.

१९) तसेच कर्ज रकमेइतके स्थावरमालमत्तेचे तारण देणे आवश्यक राहील. त्याचे ई – फाईनिलंग सुविधेतर्गत इक्वीटेबल मॉर्गेज करुन देणे आवश्यक राहील.

२०) वरीलपैकी कोणतीही अट रद्द करणे, बदल करणे किंवा जादा अट समाविष्ट करणेचा अधिकार बँकेस राहील.

तांत्रिक अटी :

१. युनिटचे संगोपन 'बंदिस्त शेळीपालन' पध्दतीनेच करण्यात यावे.

२. रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी गोठा व जमीन नियमित स्वच्छ ठेवावी. प्रोजेक्टची जागा एन.अे. केलेली असणे आवश्यक राहील.

३. प्रजननासाठी विकत घ्यावयाच्या मादीचे वजन २० ते २५ किलो व ती नुकतीच व्यालेली अगर गाभण असावी. तसेच 'नर' जातीवंत व २४ ते ३० महिने वयाचा असावा. शेळयांचे संबंधी आवश्यक वाटल्यास महाराष्ट्र राज्य शेळी व महामंडळाच्या संशोधन व संगोपन केंद्राशी संपर्क साधण्यात यावा.

४. प्रजननासाठी वापरण्यात येणारा नर हा प्रत्येक तिसऱ्या वर्षी बदलण्यात यावा. निकृष्ट शेळयांची विक्री करुन व विक्रीच्या प्रमाणात प्रजनन योग्य शेळयांची निवड करुन कळपांची संख्या नियमित ठेवावी. नव्याने घेण्यात येणाऱ्या जनावराच्या कानावर क्रमांक नोंदविण्यात यावेत.

५. पाण्याचा पुरवठा पोटॅशियम परमॅगनेटने निर्जंतूक व स्वच्छ असावा. खाद्य व पाण्याच्या भांडयांना दर आठवडी चुन्याचा हात द्यावा.

६. अर्जदार कंपनीने स्वमालकीची जमीन वैरण पैदासीसाठी उपयोगात आणावी. सशक्त व चांगल्या मेंढया / शेळयांची पैदास होण्यासाठी गाभण काळातील शेवटचे दोन महिने सकस आहार द्यावा. नरांच्या निकोप वाढीसाठी व पोषणासाठी नियमित सकस पशु आहारांचा पुरवठा करण्यात यावा.

७. शेळीपालन व्यवसायात यश मिळविण्यासाठी शेळयांचे आरोग्य रक्षणाकडे विशेष भर देण्यात यावा. याकरीता खालील रोग प्रतिबंधक उपायांचे अवलंबन काटेकोरपणे करण्यात यावे.

अ. क्र.	महिना	लसीचे नाव	शेरा
१	मे पहिला पंधरवाडा	बुळगांडया	रोगांचा प्रादुर्भाव असलेल्या भागात लसीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.
२	मे दुसरा पंधरवाडा	घटसर्प	दरवर्षी नियमितपणे लसीकरण करणे.
३	जून पहिला पंधरवाडा	आंतरविणार (एन्टरोटॉक्सेमिया)	दरवर्षी नियमितपणे लसीकरण करणे.
४	जून दुसरा पंधरवाडा	फऱ्या रोग	रोगांचा प्रादुर्भाव असलेल्या भागात लसीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

८. वार्षिक जंतुनाशक उपाययोजना

१. जानेवारी ते जून	१ टक्का कॉरोसल्फेट द्रव्य	सुत्रकृमी
२. मार्च व जुलै	पॅनक्युर अथवा बॅनमिल्थ	गोलकृमी
३. मे व ऑक्टोबर	डिस्टोडीन किंवा अॅबेधोलेन	यकृतातील कृमी

९. जनावरांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपलब्ध सेवा शासनाच्या पशुसंवर्धन खात्याकडून नियमित प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

१०. उत्पादनात 'नर' व 'मादी' करंडाची विक्री साधारणतः त्यांचे ५ ते ७ महिन्यात करणे आर्थिकदृष्टया फायदेशीर ठरते. त्या दृष्टीने कार्यवाही व्हावी.

११. शेळयांच्या संगोपन खर्चाचा व उत्पादनाबाबत जमाखर्च ठेवण्यात यावा. या जमाखर्चामध्ये प्रामुख्याने ओला व वाळका चारा, पशुखाद्यांचे प्रति दिवसांचे/आठवडयांचे प्रमाण औषधाचा खर्च, मृत्युचे प्रमाण, मजूरी व इतर खर्च या बाबींची नोंद रजिस्टरमध्ये ठेवण्यात यावी. सभासदाने केलेला खर्च व जमा झालेल्या रकमा यांचा जमाखर्चाचा हिशेब ठेवण्यात यावा.

१२. योजने अंतर्गत होणारा पतपुरवठयाचे कर्ज वितरण, कर्ज विनियोग, लाभधारकांना मार्गदर्शन देण्याचे दृष्टीने लाभधारकाने ठेवलेले हिशेबी रेकॉर्ड तपासणीचा अधिकार बँकेस राहील.

१३. कर्ज परतफेड : सदर कर्ज ६ वर्ष मुदतीचे व समान ५ वार्षिक किंवा १० सहामाही हप्त्यात परतफेड करावयाचे आहे. (सुरुवातीचे पहिले वर्ष सवलतीचा कालावधी)

१४. सदर कर्जपुरवठा वरील सर्वसाधारण व विशेष अटीशिवाय बँकेच्या कर्ज धोरणातील तत्संबंधीच्या व तरतूदींना अनुसरुन करण्यात येईल.

१५. तसेच सदर अटींमध्ये फेरबदल करणे तथा जादाचे अटी टाकण्याचा अधिकार बँकेस राहील.

922

२] दुग्ध व्यवसाय कर्ज धोरण

कर्जाचे कारण : या योजनेखाली दुधाच्या म्हैंशी व गायीसाठी शेडसह खालील धोरणानुसार कर्ज पुरवठा केला जाईल.

कर्ज मर्यादा : प्रकल्प अहवालाचे ७५% इतकी राहील. (नाबार्डचे सी.एम.अे.नॉर्म्सनुसार कर्जाची एक्सपोजर मर्यादा विचारात घेतली जाईल.) कर्जदाराची प्रकल्पातील (गुंतवणूक २५% इतकी राहील.)

कर्ज कालावधी : ६ वर्षे (१ वर्ष सवलतीच्या (मोरोटोरियअम) कालावधीसह)

व्याजदर : कॉर्पोरेट कर्जधोरणानुसार राहील.

कार्यक्षेत्र : बँकेच्या कॉर्पोरेट कर्जधोरणानुसार राहील.
(कर्जदाराने प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करणे आवश्यक राहील तसेच सदर प्रकल्प अहवालाची, सदर क्षेत्रातील तज्ञांकडून, प्रकल्पाची, तांत्रिक व आर्थिक व्हायबेलिटी विचारात घेऊन कर्ज मर्यादा मंजूर केली जाईल.)

मुख्य तारण : प्रकल्प जमीन

अतिरिक्त तारण : कर्ज रक्कमेइतकी स्थावर मालमत्ता.

पात्र लाभधारक : बँकेच्या कॉर्पोरेट कर्जधोरणानुसार राहील.

प्रोसेसिंग फी : कॉर्पोरेट कर्जधोरणानुसार राहील.

जामिनदार : दोन जामिनदार आवश्यक

अ] दुभत्या म्हशी व गाईखरेदी

१) कंपनीकडे स्वमालकीची जमीन असावी अथवा त्याचेकडे जनावराचे गोठ्याकरीता स्वत:च्या मालकीची जमीन असावी.

२) एका युनिटसाठी खालीलप्रमाणे कर्ज उपलब्ध होईल.

तपशील	युनिट	वाटपाचे हप्ते
जनावरांचा प्रकार	किमान २५ जनावरे कमाल १०० जनावरे	सहा महिन्याचे अंतराने

३) प्रथम खरेदी केलेल्या जनावराचे कर्ज हप्ते नियमीत परतफेड केली असल्यास सहा महिन्यानंतर उर्वरीत जनावराचे कर्ज अदा केले जाईल.

४) ज्या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरेशी विकसित असेल तेथेच असा कर्जपुरवठा केला जाईल या संबंधी कंपनीने दूग्ध व्यवसायीक संस्थेशी करार करणे आवश्यक राहील.

५) जेथे सहकारी यंत्रणेमार्फत दुध संकलन विक्रीची व्यवस्था नसेल अशा ठिकाणी संकलीत दुध हॉटेल, हॉस्पीटल इत्यादीसारख्या संस्थांना पुरविण्याची व्यवस्था असल्यास व दुध विक्रीची रक्कम, अशा संस्थेकडून परस्पर मिळण्याची खात्री असल्यास कर्ज देणे बाबत विचार केला जाईल.

६) कर्जदार कंपनीने दुध विक्री रक्कमेच्या ५० टक्के किंवा मासिक हप्त्यांच्या रक्कमेइतके, यापैकी जास्त असलेली रक्कम, कंपनीच्या मुंबै बँकेतील चालू खाती जमा करण्याची हमी ठरावान्वये दिली पाहिजे.

७) अर्जदार कंपनीस किमान २५ व कमाल १०० जनावरांचे युनीटसाठी कर्जपुरवठा केला जाईल.

ब] दुभती जनावरे व शेडसाठी एकत्रित कर्ज

या योजनेअंतर्गत कंपनीचे जमीन धारणेनुसार किमान २५ व जास्तीत जास्त १०० दुभती जनावरे खरेदीसाठी, व शेड बांधकामासाठी खालील तपशिलास अनुसरून कर्ज पुरवठा केला जाईल.

अ. क्र.	लाभार्थीची किमान जमिन धारणा	युनिट तपशिल
१	१.२५ हेक्टर	२५ दुभती जनावरे, शेडसह
२	२.५० हेक्टर	५० दुभती जनावरे, शेडसह
३	५.०० हेक्टर	१०० दुभती जनावरे, शेडसह

सदर कर्ज फक्त जातीवंत जनावरांचे युनिटसाठी मंजूर करणेत येईल.

अ. क्र	कर्जाचे कारण	कर्जदर रु.
१	दुभती जनावरे खरेदीसाठी	
	अ) जर्सी/होस्टेन फ्रिजीयन/रेड डॅनिस (संकरीत गाई)	रु.५५०००/–
	ब) गीर/थारपारकर/हरयाणा/कांकरेज (देशी गाई)	रु.३००००/–
	क) नागपूरी /पंढरपूरी /मराठवाडा/भडवरी /धारवारी म्हैस	रु.४००००/–
	ड) जाफराबादी / सुरती म्हैस	रु.४००००/–
	ई) मेहसाना म्हैस	रु.७००००/–
	प) मु–हा म्हैस	रु.८००००/–
	फ) भाकड /गाभण म्हैशीसाठी	रु.३००००/–
२	रेडा खरेदी	रु.३००००/–

शेड बांधकामासाठी कर्जदर खालील प्रमाणे.

अ. क्र.	कर्जाचे कारण	कर्जदर रु.
१	अ) शेड बांधकाम (गोठा) १ चौ.फुटास (दुग्ध व्यवसायासाठी) १) मातीचे शेडबांधकाम करुन प्लॅस्टर २) सिमेंटने शेड बांधकाम करुन प्लॅस्टर ३) अत्याधुनिक पध्दतीने शेडबांधकाम करणे (पर्यावरण नियंत्रीत शेड)	१८०/– ३००/– ४००/–

शेडसाठी प्रती जनावर, ६० चौ.फूट (४० चौ.फूट जनावर व २० चौ.फूट वासरू किंवा पारडासाठी) क्षेत्रफळ गृहित धरण्यात येईल. अर्जदार कंपनीचे मागणीवरून असे कर्ज जनावराच्या कर्जाव्यतिरिक्त शेड बांधकामासाठी जादा कर्ज म्हणून असेल.

क) दुग्ध व्यवसायासाठी कर्जाचे बाबत इतर अटीं व नियम खालील प्रमाणे राहतील.

१) ज्या जातीची जनावरे खरेदीसाठी कर्ज मंजूरी असेल त्या व्यतिरिक्त अन्य जातीची जनावरे बँकेच्या पूर्व परवानगिशिवाय खरेदी करता येणार नाहीत.

२) जातीवंत दुभत्या जनावरांची खरेदी गुजरात, गोरेगांव, धुळे, कल्याण व संबंधीत व्यवसायाच्या ठिकाणी प्रचलीत मार्केट येथून खरेदी समिती मार्फत केली पाहिजे.

३) जनावरे व शेडवर कर्जाचा बोजा राहील. तसेच बँकेच्या पूर्वपरवानगी शिवाय त्यांची विक्री करता येणार नाही. पूर्व परवानगिशिवाय विक्री केल्यास वा अन्य प्रकारे विल्हेवाट लावल्यास संपूर्ण कर्ज एक रकमी वसूलीसपात्र राहील व तशी पूर्तता करुन घेणेची जबाबदारी कर्जदार कंपनीची राहील.

४) कर्जदार कंपनीस किमान २५ व कमाल १०० दुभती जनावरे खरेदीसाठी कर्ज दिले जाईल.

५) देखरेखीच्या दृष्टीने सुलभ, पशु वैद्यकीय उपचार केंद्र, ब्रिडींग सेंटर्स नजीक असलेल्या तसेच उत्पादित दुध विक्रीची व्यवस्था असलेल्या कंपनीस असा कर्ज पुरवठा करणेचे धोरण राहील.

६) जनावरांची खरेदी निष्णांत पशु वैद्यकिय अधिकारी, बँक प्रतिनिधी, लाभधारक, कंपनी प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत केली जाईल.

७) चांगल्या प्रतीच्या नुकत्याच व्यालेल्या व शक्यतो दुसऱ्या किंवा तिसऱ्या विताच्या जनावरांची लाभधारकांनी खरेदी केली पाहीजे.

८) जनावरे खरेदीनंतर, जनावरांचे ओळखीसाठी विमा कंपनीकडील इअर टॅग, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत टॅगींग करुन घेण्यात यावे. जनावरांचा विमा, विमा कंपनी मार्फत आवश्यक विम्याची प्रमाणपत्रे देऊन ताबडतोब उतरवून घ्यावा व विमा कालावधीत जनावरांचे टॅग हरविल्यास पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून रिटॅगींग करुन घेण्यात यावीत व त्याची प्रमाणपत्रे विमा कंपनीला सादर करुन स्थळ प्रत शाखेत ठेवावी.

विमा कालावधीत जनावर मरण पावल्यास कंपनीने त्याची माहिती बँकेच्या कर्जपुरवठा केलेल्या शाखेस त्वरीत माहिती द्यावी. व संबंधीत शाखा व्यवस्थापक यांना विमा कंपनीस व पशुवैद्यकीय अधिकारी यांना मोबाईल / ई.मेल/ लेखी कळवावे. परंतू जनावर विमा उतरविल्यापासुन, एक महिन्याच्या आत दगावल्यास, तसेच जनावरांच्या कानातील टॅग हरविल्यास कंपनीस विमा संरक्षित रक्कम उपलब्ध होणार नाही.

९) खरेदी केलेल्या जनावरांचे वय, आरोग्य याबाबत निष्णांत पशू वैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र घेऊन त्याच्या प्रती, कंपनी व शाखेच्या दप्तरी ठेवल्या पाहिजेत व त्याच्या सविस्तर नोंदी रजिस्टरला केल्या पाहिजेत.

१०) विशिष्ट भागांत जनावरांना प्रादुर्भाव होणाऱ्या रोगांपासून संरक्षण म्हणून पशुसंवर्धन खात्याचे सल्याने खरेदी केलेल्या जनावरांना रोग प्रतिबंधक लस टोचून घ्यावी.

११) लाभधारक कंपनीकडे जनावरांस हिरवा किंवा सुका चारा तसेच सकस आहार पुरविणेची पुरेशी व्यवस्था पाहिजे.

१२) जेथे गुरांच्या गोठयासाठी कर्ज दिले जाणार नाही, तेथे दुभत्या जनावरांकरीता लाभधारकांकडे गुरांचा गोठा असला पाहीजे वा त्याची स्वखर्चाने गुरांचा गोठा तयार रण्याची क्षमता असली पाहिजे.

१३) जेथे संकरित / देशी गाईसाठी कर्ज पुरवठा करावयाचा आहे. तेथील परिसरांत उच्च प्रतीच्या कृत्रिम रेतनाची व्यवस्था कृत्रिम रेतन केंद्रवर असली पाहिजे.

१४) कर्जदार कंपनीने कर्ज उचल करण्यापूर्वी, बँकेच्या अटीप्रमाणे, दूध विक्री रकमेतून परस्पर कर्ज कपात करुन देणेची दूध संकलन संस्थेकडील हमी घेऊन त्यानुसार नियमित रक्कम वसुल करुन बँक कर्जखाती भरणा करणेची लेखी हमी ठरावानिशी बँकेस दिली पाहीजे.

१५) कर्जदार कंपनीने कर्जाद्वारे घेतलेल्या दुभत्या जनावरांचा विमा कर्ज फेडीच्या मुदतीपर्यंत अथवा कर्ज फिटेपर्यंत वेळोवेळी उतरविला पाहिजे.

१६) रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे लाभधारक कंपनीकडे पुरेसे तारण देणेच्या परिस्थिती असली पाहिजे.

१७) दुग्ध व्यवसायासाठी, लाभधारक कंपनीकडे आवश्यक कौशल्य / प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी असले पाहिजे.

१८) कंपनीने तारण देऊ केलेल्या क्षेत्राचे रजिस्टर मॉर्गेज करुन देणे बंधनकारक राहील.

दुभती जनावरे व शेडसाठी एकत्र युनिटकरिता वरील अटीं व्यतिरिक्त खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१) शेड बांधकामासाठी ग्रामपंचायतीची/ नगरपालीका/ महानगर पालिकेची रितसर परवानगी सादर केली पाहिजे व सदर परवांनगीवर बांधकाम करावयाचे जागेचे सर्व्हे नं. व बांधकाम क्षेत्राचा उल्लेख असावा.

२) शेडचे बांधकाम डांबर, विटा व सिमेंटने करुन चार बाजुच्या भिंती किमान ५ फूट उंचीच्या बांधून त्यावर किमान ३ फूट लोखंडी वा सिमेंट जाळी लावून त्यानंतर कौलारू अथवा सिमेंट पत्र्याचे छप्पर योग्य उंचीवर टाकणेत यावे. छप्पराला वादळ वाऱ्यापासून नुकसान पोहचू नये म्हणून योग्य अंतरावर विट बांधकाम करणेत आले पाहिजे. तसेच शेडमध्ये शहाबादी लादी बसविली पाहिजे अथवा कॉंक्रीटचा कोबा केला पाहिजे.

३) जनावरांचे मल–मुत्र विसर्जनाची योग्य व्यवस्था केली असली पाहिजे. त्याकरीता गावांत लोकवस्ती असलेल्या भागांत शेड बांधकामाकरीता कर्ज पुरवठा केला जाणार नाही. गावाबाहेर वा शेतावर बांधकाम करणेसच कर्ज पुरवठा केला जाईल.

४) ज्या जागेवर शेड बांधणेत यावयाचे असेल ती जागा कंपनीचे स्वत:चे नावावर असली पाहिजे.

५) दुभती जनावरे व शेड बांधकाम अशा एकत्र युनिटसाठी कंपनीचे नावावरील संपूर्ण जमिनीचा रजिस्टर मॉर्गेज करुन देणे बंधनकारक राहील. शिवाय कर्जातून बांधलेल्या शेडचे साधे गहाणखत बॅंक पुरस्कृत करील त्या नमुन्यांत करुन देणे आवश्यक राहील. याशिवाय कंपनीचे मालकीची तसेच कर्जातून खरेदी केलेली दुभती जनावरे यावर कर्जाचा बोजा राहील व त्याची विक्री बॅंकेच्या पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

६) दुभत्या जनावरांसाठी घेतलेल्या कर्जाची वसुली व्यतिरिक्त, दुधविक्रीतून दरमहा प्रति जनावरांमागे बॅंक ठरवून देईल त्याप्रमाणे रक्कम शेडसाठीचे कर्जापोटी भरणा करणे आवश्यक राहिल, व त्यादृष्टीने ते करारमदार करुन द्यावे लागतील.

७) ज्या भागांत दुग्ध व्यवसायास अनुकुल परिस्थिती असेल अशाच भागांत सदरचा कर्ज पुरवठा करणेत येईल.

८) शेड बांधकामासाठी कर्जाची उचल प्रथम ५०% व नंतर ५०% च्या दोन हप्त्यांप्रमाणे दिली जाईल. प्रत्येकी हप्त्यांची उचल करतांना, अगोदर उचल केलेल्या रकमेचा पुर्ण विनियोग केल्याबाबत, बॅंकेचे पी.एम.सी व बॅंक तपासनीस यांचे प्रमाणपत्र सादर केल्यावर पुढील उचल दिली जाईल.

९) शेडसह दुग्ध व्यवसायासाठी कर्ज मागणी असल्यास सवलतीचा कालावधी एकूण परतफेड हप्त्यांमध्ये अंतर्भूत राहील.

१०) दुभती जनावरे व शेडसाठीच्या कर्जाची पूर्ण फेड होईपर्यंत शेड व जनावरांचा विमा उतरविणे आवश्यक राहील. पहिल्या वर्षीच्या विमा हप्त्यांची रक्कम कर्ज रकमेतून कपात करुन परस्पर विमा कंपनीस भरणा केली जाईल व त्यापुढे दरवर्षी विमाहप्त्या एवढी रक्कम कंपनीचे कर्ज खात्यास नावे टाकून नियमित विमा उतरविणेत येईल.

११) कंपनीची पात्रता, त्याची कर्जफेड करणेची क्षमता इ.बाबी विचारात घेवून शेड व दुभत्या जनावरांसाठी एकाच वेळी कर्ज पुरवठा करणेचा विचार केला जाईल.

१२) किमान २५ दुभत्या जनावरांचे व कमाल १०० दुभत्या जनावरांचे युनिटसाठी सदर कर्ज पुरवठा करण्यात येईल.

१३) दुभती जनावरे २४ तास गोठयात चारा पाणी जागेवरच उपलब्ध करणे बंधनकारक राहील. म्हणजेच स्टॉल फिडींग पध्दतीसाठीच सदरचे कर्ज उपलब्ध होईल.

१४) सभासदास मंजूर युनिटपैकी ५०% दुभती जनावरे प्रथम खरेदी करुन देवून. उचल केलेल्या कर्जाची नियमित वसुली येत असल्याची खात्री करुन सहा महिन्यानंतर उर्वरित ५०% रक्कम जनावरे खरेदीसाठी कर्ज उचल दिली जाईल.

१५) दुभत्या वा भाकड जनावरांची विक्री बँकेच्या पुर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. पूर्व परवानगीशिवाय जनावरांची विक्रि केल्यास कंपनीवर कायदेशीर कारवाई केली जाईल व त्यास सर्व खर्च कंपनीकडून वसुल केला जाईल.

१६) सभासदास मंजूर कर्जाची पूर्ण उचल करुन उचल केलेल्या सव्याज पूर्ण फेड केल्यानंतर त्याचा एकंदरीत कर्ज फेडीचा अनुभव विचारांत घेऊन पुनश्च फक्त दुभत्या जनावरांचे खरेदीसाठी तसेच जादा शेडसाठी कर्ज पुरवठा करणेचा विचार केला जाईल.

१७) सदर कर्जासाठी कर्ज मागणी करणाऱ्या कंपनीस दुग्ध व्यवसायाचा अनुभव असला पाहिजे अथवा त्यांचेकडील दुग्ध व्यवसायासंबंधी प्रशिक्षण घेतलेले अधिकारी / कर्मचारी असले पाहिजे. तपासणीस यांनी छाननीचे वेळी सदर बाबींची खात्री करुन त्याबाबत सविस्तर अहवाल दिला पाहिजे.

१८) सदर अटीमध्ये फेरबदल करणे, अट रद्द करणे अथवा जादा अट समाविष्ट करणेचा अधिकार बँकेस राहील.

४] हरितगृह (पॉलीहाऊस) उभारणेसाठीचे कर्ज :-

हरितगृहाच्या नैसर्गिक वायुविजन (Open Ven + Polyhouse व वातावरण नियंत्रित (Climate Control Polyhouse) प्रकारच्या हरितगृह उभारणीसाठी मंजूर करावयाच्या कर्जासंबंधी अटी खालील प्रमाणे राहतील.

कर्ज मर्यादा : प्रकल्प अहवालाचे ७५% कमाल रु.५.०० कोटी इतकी राहील. (नाबार्डचे सी.एम.अे.नॉर्म्सनुसार कर्जाची एक्सपोजर मर्यादा विचारात घेतली जाईल.) (कर्जदाराची प्रकल्पातील गुंतवणूक २५% इतकी राहील.)

कर्ज कालावधी : ६ वर्षे (१ वर्ष सवलतीच्या (मोरोटोरियअम) कालावधीसह)

व्याजदर : कॉर्पोरेट कर्ज धोरणानुसार राहील.

कार्यक्षेत्र : बँकेच्या कॉर्पोरेट कर्ज धोरणानुसार राहील.
(अर्जदाराने प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करणे आवश्यक राहील तसेच सदर प्रकल्प अहवालाची, सदर क्षेत्रातील तज्ञांकडून, प्रकल्पाची, तांत्रिक व आर्थिक व्हायबेलिटी विचारात घेऊन कर्ज मर्यादा मंजूर केली जाईल.)

जमिनदार : दोन जमिनदार आवश्यक

मुख्यतारण : प्रकल्पाची जमिन

कर्जापोटी घ्यावयाचे अतिरिक्त तारण : कर्ज रकमेइतकी स्थावर मालमत्ता.

पात्र लाभधारक : बँकेच्या कॉर्पोरेट कर्ज धोरणानुसार राहील.

प्रोसेसिंग फी : कॉर्पोरेट कर्ज धोरणानुसार राहील.

अटी शर्ती :-

१) कर्जदार कंपनीकडे स्वमालकीची जमिन असावी व तसेच शेडनेट हाऊससाठी NHM १००० चौ.मीटर साठी ०.४० हेक्टर व हरितगृह (पॉली हाऊससाठी) ५०० चौ.मीटरसाठी ०.४० हेक्टर जमिन क्षेत्र असावे. कंपनी जादा क्षेत्रासाठी कर्ज मागणी केल्यास, त्यापटीत तारण क्षेत्र द्यावे लागेल. वैयक्तिक कर्ज मागणी करणाऱ्या सभासदाने जमिन क्षेत्राशिवाय दोन जामिनदार देणे आवश्यक आहे. जमिन क्षेत्रावर कर्ज रकमेईतका रजिस्टर मॉर्गेजद्वारे बोजा चढविणे आवश्यक राहील.

२) कंपनीस किमान ५०० चौ.मी. ते ४००० चौ.मी. क्षेत्रापर्यंत कर्ज मागणी करता येईल.

३) महाराष्ट्र शासन कृषी विभागाने अनुदान मिळणेबाबत पूर्व संमती पत्र सादर करणे आवश्यक राहील.

४) सदर कारणासाठी सवलतीचा कालावधी एक वर्षाचा राहील व तो एकूण मुदतीत समाविष्ट राहील, कर्ज परतफेड दर सहामाही राहील, पॉली हाऊससाठी ८ वर्षे तर शेडनेटसाठी ५ वर्षे परतफेडीचा कालावधी राहील.

५) कंपनीकडे तांत्रिक शिक्षण घेतलेले अधिकारी / कर्मचारी असावी व त्याने हार्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर येथे प्रशिक्षण घेण्याची हमी द्यावी किंवा रु.१००/– चे स्टॅम्प पेपरवर तांत्रिक मार्गदर्शनसाठी कर्ज फिटेपर्यंत तज्ञ व्यक्तींचे करारपत्र सादर करावे.

६) मंजूर कर्जाची उचल तीन हप्त्यात देणेत येईल. प्रथम ६०% नंतर २०% व तिसरा हप्ता २०% अशी उचल बँकेच्या कृषी अधिकारी / शाखा व्यवस्थापक किंवा तपासणीस यांची संयुक्त पहाणी करुन तसा दाखला दिल्यानंतर देणेत येईल.

७) कंपनीची २५% स्वगुंतवणूकीची रक्कम विचारात घेऊन कोटेशननुसार रक्कम डी.डी./धनादेश / एन.ई.एफ.टी./आर.टी.जी.एस.द्वारे अदा करणेत येईल.

८) कुठल्याही नैसर्गिक आपत्तीने शेडनेट, हरितगृहाचे व प्रकल्पातील इतर साहित्याचे नुकसानीची जबाबदारी कर्जदार कंपनीची राहील व त्यास संरक्षण म्हणून पुरेशा रकमेचा विमा उतरविणेची जबाबदारी कर्जदार कंपनीची राहील.

९) अनुदान मंजूर करुन घेणेची जबाबदारी कर्जदार कंपनीची राहील व मिळणारे अनुदान थेट कर्ज खाती वळते करुन देणेबाबत रु.१००/– च्या स्टॅम्प पेपरवर संमतीपत्र सभासदांकडून घेणेत येईल.

१०) प्रकल्पाची तपासणी बँकेने नेमलेल्या अधिकारी / पी.एम.सी. यांचे देखरेखीखाली करण्यात येईल.

११) बँक कर्ज धोरणानुसार व्याज आकारणी करण्यात येईल व त्यात वेळोवेळी होणारा बदल कर्जदारावर बंधनकारक राहील.

१२) उपरोक्त अटीमध्ये फेरबदल करणे अट रद्दबातल करणे अथवा जादा अट समाविष्ट करणेचा अधिकार बँकेस राहील.